# B.A. IV SEM
# INDIAN SOCIOLOGICAL THINKERS
# ( भारतीय समाजशास्त्रीय विचारवंत )

## Dr. Radhakamal Mukherjee

## (डॉ. राधाकमल मुखर्जी)

# सर्वसामान्य परिचय
# डॉ. राधाकमल मुखर्जी

- जन्म – पश्चिम बंगालच्या बरहमपूर शहरात 7 डिसेंबर 1889 ला
- इतिहास आणि अर्थशास्त्र या विषयांचे अध्ययन
- महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यावर बरहमपूर येथील कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रूजु
- डॉक्टरेट पदवी –'भारतीय ग्ग्रमीण समुदायामध्ये सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन'
- नंतर लखनौ विद्यापिठात अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत
- या विषयांमध्ये मोलाचे संशोधन आणि ग्रंथ लिखाण

# डॉ. मुखर्जींचे मूल्ये व प्रतिकांविषयी विचार

- डॉ. मुखर्जींचा मूल्यांचा सिध्दांत विशेष प्रसिध्द.
- या सिध्दांतात पौर्वात्य आणि पाश्चात्य या दोन्ही विचारधारांचा समन्वय.
- त्यांच्या मते, 'समाजाने स्विकारलेली व मान्यता दिलेली जीवनप्रणाली म्हणजे मूल्य. मूल्य आपल्या सामाजिक जीवनासाठी महत्वपूर्ण.
- सामाजिक मूल्य संपूर्ण सामाजिक संघटन आणि व्यवस्थेचा आधार.
- प्रत्येक समाजाची मूल्ये त्या समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमीवर आधारित.
- भारतीय समाजात विवाह हे एक सामाजिक मूल्य आहे. या मूल्यानुसार विवाह हे एक पवित्र आणि धार्मिक बंधन आहे.
- मूल्य हे सामाजिक मानक असल्यामुळे ते सामाजिक जीवनाच्या अंतः संबंधाची व्याख्या करण्यास सहाय्यक.
- मूल्यांद्वारे भावना, विचार, क्रिया, गुण, वस्तू, व्यक्ती, समूह उद्देष आणि साधन या सर्वच गोष्टींचे मूल्यांकन.
- मूल्यांना भावनात्मक आधार.

# मूल्यांचे प्रकार किंवा श्रेणी

- 1. **जैविक मूल्ये** – समाज, स्वास्थ्य व संरक्षणाशी संबंधित. मानवी अस्तित्व व विकास साध्य करतांना सभोवतालच्या जैविक व अजैविक परिस्थितीशी नेहमीच समायोजन.
- 2. **सामाजिक मूल्ये** – उत्सफुर्त प्रेम, समता व न्यायाशी संबंधित. अशा उच्च मूल्यांच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास असे दिसून येते की, मानवी जीवन हे इतरांच्या सहभागाशिवाय अपूर्ण आहे.
- 3. **आध्यात्मिक मूल्य** – मानव प्राण्यात दया, करुणा, विनम्रता क्षमा, शांती इत्यादी अनेक मूल्ये आढळतात. म्हणून त्यांचे संरक्षण व संवर्धन करण्याची क्षमता मानवास प्राप्त झाली. आध्यात्मिक विचार व धर्मशास्त्राची मांडणी ही मानवी मूल्यांवर आधारित.
- **आध्यात्मिक मूल्ये** – सर्वात वरचा स्तर.
- त्यानंतर **सामाजिक मूल्यांचे** स्थान– उद्देश सामाजिक संघटन आणि सुव्यवस्था टिकवून ठेवणे
- शेवटी **जैविक मूल्यांचे** स्थान – जीवनास टिकवून ठेवणे आणि पुढे नेण्यासाठी आवश्यक.

# मूल्ये व प्रतिकांची विभाजनात्मक श्रेणी तत्वे
# (मूल्य व प्रतिकांबाबतचे डॉ. मुखर्जींचे विचार )

- 1. **मूल्यांची कालसापेक्ष व्यवस्था** – मानवी समाजात मूल्यांची प्रतिके काळानुरुप बदलणारी . जुन्या व नवीन मूल्यांच्या प्रतिकांमध्ये सुवर्णमध्य. म्हणून मूल्य व प्रतिक व्यवस्था ही निरंतर अशी कालसापेक्ष व्यवस्था.
- 2. **नीतीनियमांवर आधारित मूल्यांची प्रतिक व्यवस्था** – नीतीनियमांच्या आधारे मानव स्वतःची ध्येय व इच्छा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सतत प्रयत्नशील. कारण मूल्य व प्रतिकांवर मानवाचा विश्वास.
- 3. **प्रतिकांमध्ये मूल्यांचा आशय व्यक्त करण्याची क्षमता** – मानवी समाजात प्रत्येक मूल्यांचे प्रतीक भिन्न . या प्रत्येक प्रतिकांचा आशय परिस्थितीनुसार भिन्न. त्यांच्या मते मानवी संबंध हे मूळातच प्रतिक रूप असतात.
- 4. **समाजसापेक्ष मूल्यव्यवस्था** – व्यक्तीला सामाजिक अधिष्ठान मिळवायचे असेल तर व्यक्तीचे मूल्ये व जीवन जगण्याची पध्दत समाजसापेक्ष स्वरूपाची असायला हवी.

आदर्श व्यक्तीमत्व व सांस्कृतिक सामंजस्य बनविण्याच्या प्रक्रियेत मूल्यात्मक प्रतिक व्यवस्थेची महत्वपूर्ण भूमिका.

# मूल्ये व प्रतिकांची विभाजनात्मक श्रेणी तत्वे

- **5. नैतिक भावनेची प्रतिस्थापना** – मानवी जीवन हे इतरांच्या सहभागाशिवाय अपूर्ण.

  डॉ. मुखर्जींच्या मते नैतिक मूल्यांच्या पायावर जगाची पुर्नरचना करण्याची गरज.
- **6. व्यावसायिक नितीशास्त्राची निर्मीती** – व्यावसायिक गटात तीव्र स्पर्धा, सुप्त संघर्ष.

  अधिकाधिक नफा, लाभ प्राप्त करण्यासाठी कोणत्याही गोष्टींचा स्विकार.

  मूल्यात्मक संकेत व्यावसायिक नितीशास्त्राची निर्मीती करतात.
- **7. समता व न्यायाची प्रतिस्थापना** – विविधतेमधून विषमता आणि विषमतेतून अन्याय व शोषणाच्या व्यवस्थेची निर्मिती.

  त्यासाठी समता व न्यायाची प्रतीस्थापना करण्याची गरज.

# मूल्यांची वैशिष्टे

- 1. **जटिलता** – मानवी समाजात जितकी विविधता असते तितकी मूल्य व्यवस्था अधिक गुंतागुंतीची होत जाते. तसेच मूल्यसंघर्षातून मूल्यांचे स्वरूप अधिक क्लिष्ट होत जाते.
- 2. **सार्वत्रिकता** – काही मूल्ये ही समाजात निरंतर टिकणारी असतात. मूल्ये नितीमूल्यांशी निगडित असल्याने त्याचे संरक्षण व संवर्धन करण्याचा समाज प्रयत्न करतो. अशा मूल्यांचा समावेश सार्वत्रिक मूल्यांमध्ये होतो.
- 3. **व्यक्तीनिष्ठता** – यांचे स्वरूप वैयक्तिक व सामाजिक असे दोन प्रकारचे असते. व्यक्ती हा समाजाचा अविभाज्य घटक असल्यामुळे त्यांना मूल्यांचे पालन करणे आवश्यक असते.
- 4. **संस्कृतीचे महत्व** – काळानुसार संस्कृतीत परिवर्तन होते. तसेच मूल्यव्यवस्थेतही परिवर्तन होते. मूल्यव्यवस्थेवरच संस्कृतीची निर्मिती झालेली असते. त्यामुळे संस्कृतीला मूल्यांच्या दृष्टिने विशेष महत्व आहे.
- 5. **सांकेतिकता** – मूल्यांचे स्वरूप अमूर्त असले तरी संकेतांच्या माध्यमातून ती प्रकट होतात. प्रतिकांद्वारे मूल्यांचा अर्थ ध्वनित होतो. पवित्र मूल्ये मानवी मनावर रुजविण्याकरीता प्रतिकांचा उपयोग केला जातो.

# व्यक्तीमत्व, मूल्ये आणि परिवर्तन

## व्यक्तीमत्वातील वर्तनात्मक बदलात मूल्यांची भूमिका :

## (व्यक्तीमत्व विकासात मूल्यांची भूमिका)

- **1. सामाजिक संबंधांमध्ये सुधारणात्मक बदल** – सामाजिक संबंध सुधारावेत म्हणून स्वतःची मूल्यविषयक जाणीव दृढ करण्याचा व्यक्ती प्रयत्न करतो. समाजाच्या सामाजिक नीतीनियमांचे पालन करून व्यक्ती समाजजीवनाषी समरस होण्यास प्रयत्नषील असतो.
- **2. मानसिक एकतेच्या दृढतेसाठी विकासात्मक प्रयत्न** – मानसिक एकत्व दृढ करण्यासाठी व्यक्ती सतत धडपडत असतो. आपल्या विकासात्मक बदलाकरीता समाजबांधवांसोबत प्रेमाने वागण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे समाज मानसिक व भावनात्मक दृष्टिने एकसंघ होतो. सांस्कृतिक विकासात्मक बदलाकरीता स्वतंत्र व मुक्त अशा वैश्विक जाणिवेची गरज असते, असे डॉ. मुखर्जी म्हणतात.
- **3. व्यक्तीच्या आध्यात्मिक विकासाचा प्रयत्न** – व्यक्तीच्या आध्यात्मिक मूल्यांच्या आधारे निसर्ग, व्यवस्था आणि ईश्वर यांच्यात सुसंवाद साधण्याचा प्रयत्न व्यक्ती करतो. अशा प्रयत्नाने व्यक्तीमत्वाच्या विकासात भर पडते. तसेच व्यक्तीमध्ये उदारवादी जीवनविषयक दृष्टिकोन निर्माण करण्याची क्षमता निर्माण होते.

# सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात मूल्यांची भूमिका

- **मूल्यांच्या चक्राचा नियम** – समाज आणि संस्कृती लोकांकरीता नवीन इच्छा, नवीन उद्दिष्टे आणि नवीन साधनांना प्रस्तुत करते. त्यामुळे देखील समाजात नवीन मूल्ये निर्माण होतात.मूल्यांमध्ये परिवर्तन झाल्यास समाजामध्ये देखील परिवर्तन घडून येत
- मूल्ये हे गतीशील तथ्य आहे. मूल्यांमध्ये परिवर्तन आणि संशोधन होत असते. त्यांचा विस्तार होवू शकतो किंवा अन्य मूल्यांसोबत त्याचे एकात्मिकरण होवू शकते. आज जी मूल्ये अस्तित्वात आहेत तीच उद्या महत्वहीन होवू शकतात. त्या ठिकाणी नवीन मूल्ये निर्माण होवू शकतात.
- अंतरीकरण, सामाजिकरणाच्या प्रक्रियेद्वारे समाजातील मूल्ये स्वीकृत केली जातात. परंतु कधी कधी सामाजिकरण योग्य प्रकारे न झाल्यास ते मूल्यांचे योग्य प्रकारे पालन करीत नाहीत. हळूहळू अशी मूल्ये अस्विकृत केली जातात. त्यामुळे मूल्यांमध्ये परिवर्तन घडून येते. जेव्हा मूल्यांमध्ये परिवर्तन घडून येते तेव्हा समाजात देखील परिवर्तन होते. याचाच अर्थ मूल्यांमध्ये परिवर्तन म्हणजे सामाजिक परिवर्तन होय. त्यातून समाजाचा विकास घडून येतो.